महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग,

तिसरा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दूरध्वनी क्र ०२२-२२७९४१५०/२२०२४३३०. Email ID : doesttclass1.wrd@maharashtra.gov.in

तत्काळ

क्रमांक : संकीर्ण २०२१/प्र.क्र.१८७/२०२१/आ (वर्ग १) दिनांक : १२ जुलै, २०२१.

प्रति,

सर्व कार्यकारी संचालक/ महासंचालक, जलसंपदा विभाग.
सर्व मुख्य अभियंता (स्थापत्य/ यांत्रिकी/ विद्युत व यांत्रिकी), जलसंपदा विभाग.
सर्व अधीक्षक अभियंता (स्थापत्य/ यांत्रिकी/ विद्युत व यांत्रिकी), जलसंपदा विभाग.

**विषय : दिव्यांग अधिकाऱ्यांबाबतची माहिती देण्याबाबत.**

**संदर्भ :** १) मा.उच्च न्यायालय, मुंबई मध्ये दाखल करण्यात आलेल्या रिट याचिका (स्टॅम्प) क्र. ६८१९/२०२१ व इतर याचिकांमधील मा.उच्च न्यायालयाचे दिनांक २९.०६.२०२१ व ०८.०७.२०२१ चे आदेश.
२) शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- बीसीसी २०२१/प्र.क्र. ४५६/१६-ब(ए), दिनांक ३०.०६.२०२१.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- दिव्यांग २०१५/प्र.क्र. १७१/१६-अ, दिनांक ०५.०७.२०२१.
४) शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्रमांक- दिव्यांग २०१८/प्र.क्र. ९९/आ(संनि), दिनांक १८.०२.२०२१.

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दिव्यांग आरक्षणासंदर्भात दाखल करण्यात आलेल्या रिट याचिका (स्टॅम्प) क्र. ६८१९/२०२१ व इतर याचिकांमध्ये मा.उच्च न्यायालयाचे संदर्भाधीन क्र. १ नुसार दिनांक २९.०६.२०२१ व ०८.०७.२०२१ रोजी आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्र. २ व ३ येथील पत्र/ शासन निर्णयान्वये दिव्यांग व्यक्तींकरिता पदे आरक्षित ठेवण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

२. मा.न्यायालयाचे व सामान्य प्रशासन विभागाचे उक्त आदेशास अनुसरुन, संदर्भाधीन क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये जलसंपदा विभागातील दिव्यांगासाठी सुनिश्चित केलेली पदे विचारात घेऊन, आपल्या अधीनस्त कार्यालयातील स्थापत्य, यांत्रिकी व विद्युत व यांत्रिकी या शाखांमधील वर्ग-१ श्रेणीच्या कार्यकारी संचालक/ महासंचालक, मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, सहायक कार्यकारी अभियंता, सहायक अभियंता श्रेणी-१, उप

विभागीय अभियंता, उपविभागीय अधिकारी व उप अभियंता या संवर्गातील दिव्यांग अधिकाऱ्यांची माहिती त्यांच्या दिव्यांगाबाबतच्या वैद्यकीय प्रमाणपत्रासह सोबत जोडलेल्या विवरणपत्रात शासनास विनाविलंब सादर करावी, ही विनंती.

३. सदर पत्र जलसंपदा विभागाच्या www.wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सोबत : विवरणपत्र.

(प्र. वि. कुलकर्णी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत : आ (वर्ग-१) कार्यासन संग्रहार्थ.

शासनाचे पत्र क्र.संकीर्ण २०२१/प्र.क्र.१८७ /२०२१/आ (वर्ग १), दिनांक १२ जुलै, २०२१ चे विवरणपत्र.

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नांव, पदनाम | सध्या कार्यरत असलेले कार्यालय | मूळ संवर्ग | नियुक्तीचा दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | दिव्यांग प्रकार | केव्हापासून दिव्यांग प्रवर्गात समावेशन | दिव्यांग प्रमाणपत्र आहे/ नाही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

टिप: सोबत दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्राची सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेली प्रत जोडावी.